FORM-1A N.C.R.B

I.I.F.-I

## पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154142

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुंबई पहिली खबर क्र. FIR No. २४, वर्ष Year २०२१ दिनांक Date ११/०८/२०२१

2. (i) अधिनियम Act
   (ii) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलमे Sections ७
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार गुरुवार, तारीख पासून ०५/०८/२०२१ वेळ १५:१०, तारीख पर्यंत १०/०८/२०२१ वेळ १४:४५
   Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date ०६/०८/२०२१, वेळ Time १६:००
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०१/२०२१ तारीख Date ११/०८/२०२१ वेळ Time ०१:००

4. माहितीचा प्रकार Type of Information लेखी, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ६ कि.मी., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र.
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, ठिकाणाचे नंबर No. if any, गल्ली Ward, जुनी बिल्डींग गेटच्या रस्त्याचे नाव Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place बाहेर फुटपाथवर, गाव Village, पोस्ट Post, बांद्रा - कुर्ला संकुल तालुका Taluka, जिल्हा Dist. बांद्रा (पू.), राज्य State मुंबई
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station, तालुका Taluka, जिल्हा Dist., राज्य State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name सजीव के (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name आनंद के
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ६४ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ७५०६३३०५११
   (e) पारपत्र क्रमांक Passport No., दिल्याचा दिनांक Date of Issue, दिल्याचे ठिकाण Place of Issue (f) व्यवसाय Occupation हॉटेल व्यवसाय
   (g) धर्म Religion, जात Caste, जनजात Sub-Caste
   (h) पत्ता Address १६०२, गल्ली / वार्ड नं. Ward एकोना सी एच एस (एम.आर.ए) घर / नाव नं. House/Name No. फोन / मो. नं. Phone/Mo. No. लिमीटेड, पॅन नं. PAN No. एम जी व्होटर्स नं. Card No. क्रॉस रोड
   रस्त्याचे नाव Road कांदिवली (प) जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place मुंबई, गाव Village, पोस्ट Post, पो. स्टे. P. Stn.
   तालुका Taluka, जिल्हा Dist., राज्य State, सध्याचा पत्ता Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   श्री सुनिल दशरथ आरपाडकर, वय ४६ वर्षे, धंदा-नोकरी (सहाय्यक समाज विकास अधिकारी नेमणूक - मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, जुनी इमारत, ४ था मजला, 'जी' विंग बांद्रा-कुर्ला संकुल मुंबई - ४०००५१) रा. टी-एम.एम आर डी ए क्वॉटर्स, डी-२/०२, सेक्टर २१ सी बी डी बेलापूर, नवी मुंबई

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

Scanned with OKEN Scanner

(भा.पो.से.),

खालील फिर्यादी श्री. सजीव आनंद के, वय ६४ वर्षे, रा. बी-१६०१, पाकीजा सी.एच.एस (एस.आर.ए) लिमीटेड. एम.जी क्रॉस रोड, कांदीवली (मुंबई. यांचा स्वतंत्र कागदावर नोंदविण्यात आलेला जबाब हिच गुन्हा प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे

समक्ष

[signature] ११.८.२१

( प्रविण अनगोळकर )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

[signature] 11/08/2021

( सजीव आनंद के )

Scanned with OKEN Scanner

दि. ११/०८/२०२१ 8|C

फिर्याद

श्री. सजीव आनंद के, वय ६४ वर्षे, धंदा–हॉटेल व्यवसाय, रा.ठि. १६०१, पाकीजा सी.एच.एस. (एस.आर.ए.) लिमिटेड, एम.जी. क्रॉस रोड, कांदीवली (प), मुंबई ६७, मो.क्र. ७५०६३३०४११

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर मागील ०२ वर्षापासून माझे कुटुंबासह रहात आहे. माझा हॉटेल व्यवसाय असून त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून मी माझे कुंटुबांचा उदरनिर्वाह चालवितो.

माझ्या मालकीचे साई दर्शन सुंदर नगर, परेल रेल्वे स्टेशनजवळ, आय.डी.क्र. ५, नकाशा क्र. ४ पुर्व, परेल, मुंबई १२ येथील घर सन २०१६ मध्ये परळ स्टेशनवर झालेल्या चेंगराचेंगरीतनंतर एमएमआरडीए विभागाकडून अतिक्रमणामध्ये तोडण्यात आलेले होते. त्याऐवजी एमएमआरडीए विभागाकडून मला बिल्डींग नं. २३/ए, रूम नं ६०२, हिरानंदानी, टाटानगर, मानखुर्द, मुंबई ही सदनिका नोव्हेंबर २०१७ मध्ये मंजुर झाली होती. परंतु नमूद सदनिकेचा ताबा मी घेतला नव्हता. त्याकरीता मी संबधित विभागास दिनांक २०/११/२०१९ रोजी मुदतवाढ पत्र पाठविले होते. त्यानंतर मी सदर सदनिकेचा ताबा मिळण्याकरीता दिनांक ०२/०८/२०२१ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, सामाजिक विकास अधिकारी, एमएमआरडीए, बांद्रा पुर्व, मुंबई यांना विनंती अर्ज केला होता. त्यानंतर मी दोन वेळेस एम.एम.आर.डी.ए. मधील संबधित अधिकारी, सहाय्यक समाज विकास अधिकारी श्री. आटपाडकर यांना भेटलो. परंतु त्यांनी माझे अर्जासदर्भात कार्यवाही चालु असुन नंतर येवुन भेटण्यास सांगितले.

त्यानंतर दिनांक ०५/०८/२०२१ रोजी मी पुन्हा सहाय्यक समाज विकास अधिकारी श्री. आटपाडकर यांना भेटण्याकरीता त्यांचे कार्यालयात गेलो असता, लोकसेवक श्री. आटपाडकर यांनी मला कार्यालयाच्या गेटच्या बाहेर येतो असे सांगितले. त्यानंतर दुपारी ४:०० वाजेच्या सुमारास ते मला कार्यालयाच्या गेटच्या बाहेर भेटण्यास आले. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, 'तुमचे काम जुने असुन तुमचे काम करून पाहिजे असेल तर मला दोन लाख रूपये दयावे लागतील'. त्यावेळी मी त्यांना इतकी रक्कम देणे शक्य नसलेबाबत सांगुन तेथून निघुन गेलो.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम.एम.आर.डी.ए.), मुंबई कार्यालयातील सहाय्यक समाज विकास अधिकारी श्री. सुनिल आटपाडकर हे लाच घेतल्याशिवाय माझे काम करणार नसल्याची खात्री झाल्याने तसेच त्यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी, माझा मित्र दिलीप घाग याचेसह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे दिनांक ०६/०८/२०२१ रोजी सांयकाळी त्यांचे विरूध्द तक्रार देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो व मला मराठी लिहीता येत नसल्याने मी माझा मित्र दिलीप घाग यांचेकडून लेखी तक्रार लिहून घेतली. माझ्या तक्रारीवर कारवाई करण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन पो.नि. बनगोसावी व पो.नि. लांधी यांना नेमण्यात आले. त्यांनी मला माझे तक्रारीची पडताळणी करण्याकरीता दिनांक ०९/०८/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात हजर राहण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी दिनांक ०९/०८/२०२१ रोजी ला.प्र.वि. कार्यालयात हजर झालो. त्यावेळी पो.नि. बनगोसावी यांनी दोन शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची माझेशी ओळख करून दिली. पो.नि. बनगोसावी यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून माझा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. बनगोसावी यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि.बनगोसावी यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला व पंचासमक्ष मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम.एम.आर.डी.ए.) मुंबई येथील सहाय्यक समाज विकास अधिकारी श्री. सुनिल आटपाडकर यांची प्रत्यक्ष भेट घेवून पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

त्यानतर पो.नि. बनगोसावी यांनी माझी पडताळणी पथकाशी ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह पोलीस वाहनाने निघून बांद्रा पुर्व बी.के.सी. आरबीआय कार्यालयाच्या पाठीमागील बाजुस

Bangosavi 11.8.21

[signature] 11/08

Scanned with OKEN Scanner

मोकळया जागेत रस्त्यालगत थांबलो. त्यानंतर मला पो.नि. बनगोसावी यांनी सहाय्यक समाज विकास अधिकारी श्री. सुनिल आटपाडकर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम.एम.आर.डी.ए.) कार्यालय, मुंबई यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. कांबळे यांचे सोबत पाठविले असता, एमएमआरडीए कार्यालयाच्या मेनगेटजवळ आल्यानंतर मी माझे मोबाईल क्र. ७५०६३३०... वरून लोकसेवक आटपाडकर यास त्याचे मोबाईल क्र. ८१६९४०१०७७ वर संपर्क करून मी कार्यालयाच्या बाहेर आलो असल्याचे कळवून 'मी वर येवु का तुम्ही खाली येता ?' असे विचारले असता, लोकसेवक आटपाडकर यांनी मला 'आलो आलो मी खाली आलो' असे सांगितले. म्हणुन मी व पंच श्री. कांबळे कार्यालयाच्या गेटच्या बाहेर त्यांची वाट पाहत थांबलो. बराचवेळ झाला तरी लोकसेवक आटपाडकर आले नाही म्हणुन मी माझे मोबाईल क्र. ९१३६२६५६११ वरून पुन्हा लोकसेवक यांचे मोबाईल क्र. ८१६९४०१०७७ वर संपर्क करून 'दोन मिनिटासाठी या साहेब' असे विचारले. काहीवेळाने लोकसेवक आटपाडकर हे तेथे आले. त्यावेळी मी लोकसेवक यांना 'नमस्कार साहेब... आटपाडकर साहेब मी काय बोलतो' असे बोलून माझे प्रलंबित कामासंदर्भात चर्चा करण्यास सुरूवात केली. त्यानंतर मी लोकसेवकास 'माझे काम चालु केलं की नाही एवढं सांगा' असे विचारले असता, लोकसेवक आटपाडकर याने मला (त्याचे डाव्या हाताची दोन बोटांनी निर्देशित करून) 'हो... चालु केलं....चालु केलं' असे मला म्हणाले. त्यानंतर मी लोकसेवकास 'तुम्ही सांगितल्याप्रमाणे मी करायला तयार आहे' असे बोललो. त्यानंतर मी माझे सोबत असलेले पंच श्री. कांबळे यांची ओळख माझे भावाचा मुलगा असलेबाबत लोकसेवकाशी करून दिली व त्यानंतर मी लोकसेवकास 'तुम्ही जे फिगर सांगितली ना दोन ...... दोन मधुन मी सांगितले तुम्हाला एक... एक लाख रूपये तुम्हाला आणुन देतो..' हे मी पंच कांबळे यांचेकडे हाताच्या इशारा करून लोकसेवकास सांगितले. त्यावर लोकसेवकाने 'हे असं करताय का तुम्ही....... अरे तुम्ही लोक कसं आहे ना आम्हाला समजुनच घेत नाही' यावर मी 'तुम्ही फिगर सांगा किती दयायचे' असे विचारले असता, लोकसेवकाने 'ठिक आहे.... दोन नाही ना पन्नास कमी दया' असे म्हणुन लोकसेवकाने डाव्या हाताची पाच बोट दाखवून पन्नास हजार कमी देण्याचे इशाऱ्याने देखील सांगितले. त्यावर मी लोकसेवकास 'दीड बोलत आहे तुम्ही' असे विचारले असता, लोकसेवकाने होकारार्थी मान डोलावुन 'हा मग आता करणार ... जावु दया तुम्ही नाराजगी समोर कोणाची होवू नये..' असे बोलून दीड लाख रूपये स्विकारण्याचे कबुल केले व उद्या मला फोन करून येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच श्री. कांबळे असे तेथून निघुन ठरल्याप्रमाणे शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी आलो.

त्यानंतर पोनि बनगोसावी यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. लोकसेवक श्री. आटपाडकर याने पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व लोकसेवक श्री. आटपाडकर यांनी दिनांक १०/०८/२०२१ रोजी लाचेची रक्कम रू.१,५०,०००/– घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पो.नि. बनगोसावी यांनी मला लोकसेवक आटपाडकर यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले असुन पुढील सापळा कारवाई करीता मला दिनांक १०/०८/२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता, लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी मुंबई येथे लोकसेवक श्री. आटपाडकर यांनी मागणी केल्याप्रमाणे रुपये १,५०,०००/– घेवुन येण्यास सांगितले.

त्याप्रमाणे आज दिनांक १०/०८/२०२१ रोजी मी माझे वैयक्तिक बचतीमधून शिल्लक रुपये १८,०००/– च्या भारतीय चलनाच्या २००० दराच्या ९ नोटा लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी मुंबई येथे घेवुन आलो व मी पो.नि. बनगोसावी यांना इतकीच रक्कमेची व्यवस्था झाली असल्याचे सांगितले. त्यावर पो.नि. बनगोसावी यांनी उर्वरित रू. १,३२,०००/– इतक्या किमतीच्या रू. २०००/– दराच्या ६६ खेळण्यातील डमी नोटा स.पो.आ. प्रशासन यांचे कार्यालयातून उपलब्ध करून घेत असल्याबाबत मला सांगितले. त्यानंतर पो.नि. बनगोसावी यांनी मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. माझेकडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. १८,०००/– (रू. २०००/– दराच्या ९ भारतीय चलनी नोटा) त्यांनी स्वत:चे ताब्यात घेतल्या व त्यांच्या झेरॉक्स काढल्या. व उर्वरित रू. २०००/– दराच्या ६६ खेळण्यातील डमी नोटा असे स.पो.आ. प्रशासन यांच्याकडून

Bongos 11.8.21

, उपलब्ध करून घेतले. सदर नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले. पोनि बनगोसावी यांनी लोकसेवक यानी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझ्या पॅन्टच्या डाव्या खिशातील हातरूमाल काढून गळयाभोवती वारवार हातरुमालाने पुसणे असा पुर्व नियोजीत इशारा करावा त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यास रंगेहाथ पकडतील असे सांगितले.

त्यानंतर ला.प्र.वि. कार्यालयातच पंचासमक्ष एका अंमलदाराच्या मार्फतीने लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावली व सदरची रक्कम माझे पॅन्टच्या पुढील उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर लोकसेवक आटपाडकर कार्यालयात आहे किंवा कसे हे विचारण्याकरीता माझे मोबाईल क्र. ७५०६३३०४११ वरून लोकसेवक आटपाडकर यासं त्याचे मोबाईल क्र. ८१६९४०१०७७ वर संपर्क करून 'आटपाडकर साहेब नमस्कार.... आहे का कामावर तुम्ही' अशी विचारणा करता, त्यावर लोकसेवक यांनी 'हो ....हो' असे उत्तर दिले. त्यांनतर मी लोकसेवक यांना 'किती वाजता येवू ...... तुमच बोलल्याप्रमाणे झालेलं आहे काम' असे बोललो असता, लोकसेवक यांनी ' वेरी गुड... वेरी गुड.. एकदम छान..' असे म्हणाले. त्यानंतर मी लोकसेवकास 'हा ठिक आहे साहेब...मी येतो...मी तुम्हाला कॉल करेल... बाहेरच भेटुया तिकडे कॅन्टीनजवळ' असे विचारले असता, लोकसेवकाने 'ठिक आहे साहेब......धन्यवाद' असे बोलून फोन कट केला. त्यांनतर आम्ही लोकसेवक आटपाडकर यांची भेट घेण्याकरीता शासकीय वाहनाने त्यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी रवाना झालो. बांद्रा पुर्व बी.के.सी. आरबीआय कार्यालयाच्या पाठीमागील बाजुस आल्यानंतर शासकीय वाहनातच माझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून पंच श्री. कांबळे यांचेसह सापळा कारवाईकरीता लोकसेवक श्री. आटपाडकर यांचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम.एम.आर.डी.ए.) कार्यालय, मुंबई येथे पाठविले. माझे पाठोपाठ पोलीस पथक काही अंतर ठेवून होते. मी, लोकसेवक श्री. आटपाडकर यांच्या कार्यालयाच्या मेनगेटजवळ गेल्यानंतर मी माझे मोबाईल क्र. ७५०६३३०४११ वरून लोकसेवक आटपाडकर यासं त्याचे मोबाईल क्र. ८१६९४०१०७७ वर संपर्क करून 'ओ साहेब ....आटपाडकर साहेब येता का खाली....मी काल भेटलो ना तिथेच थांबलोय' अशी विचारणा करता, लोकसेवकाने 'जेवण करून दहा मिनिटात आलो...ठिक आहे ...आलो' असे सांगितले. बराचवेळ झाला तरी लोकसेवक आटपाडकर आले नाही म्हणुन मी माझे मोबाईल क्र. ७५०६३३०४११ वरून पुन्हा लोकसेवक यांचे मोबाईल क्र. ८१६९४०१०७७ वर संपर्क करून 'हा साहेब येताय ना..' असे विचारले असता, लोकसेवक याने 'पाच... पाच मिनिट' असे बोलून फोन कट केला. काहीवेळाने लोकसेवक आटपाडकर हे कार्यालयाच्या गेटच्या बाहेर येवुन मला भेटले. त्यावेळी मी लोकसेवक श्री. आटपाडकर यांच्याशी कामासंदर्भात चर्चा करीत असताना, मी लोकसेवक यांना 'झालं काम ....माझ काम चालू केलं ना' असे विचारणा करता लोकसेवक यांनी मला 'चालू आहे साहेब' असे म्हणून त्यांनी डाव्या हाताने इशारा करून माझेकडे लाचेच्या रक्कमेची मागणी केली. म्हणून मी माझे पॅन्टच्या पुढील उजव्या खिशातील अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. १,५०,०००/-(रू. २००० दराच्या ९ भारतीय चलनी नोटा व रू. २००० दराच्या ६६ खेळण्यातील डमी नोटा) उजव्या हाताने काढून लोकसेवक आटपाडकर यांना देताना त्यांना 'हे बघा याच्यात दिड लाख रूपये आहेत' असे बोललो असता, लोकसेवक आटपाडकर यांनी मला 'हा....तुम्ही काऊन्ट केले का' असे विचारले असता, मी लोकसेवक यांस 'हो काऊन्ट केले ....तुम्ही नंतर वर जावून काऊन्ट करून बघा' असे म्हणालो. त्यानंतर लोकसेवक आटपाडकर यांनी डाव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारून त्यांच्या पॅन्टच्या पुढील डाव्या खिशात ठेवली. लोकसेवक श्री. आटपाडकर यांनी लाचेची रक्कम घेतल्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अशा रीतीने माझ्या डाव्या हाताने पॅन्टच्या पुढील डाव्या खिशातील हातरूमाल काढून गळयाभोवती वारंवार हातरुमालाने पुसुन ठरल्याप्रमाणे सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीसांनी तात्काळ लोकसेवक श्री. आटपाडकर यांना पकडले. त्यानंतर त्यांचे पॅन्टच्या पुढील डाव्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम रू. १,५०,०००/- पंचानी ताब्यात घेतली.

माझे नावे एमएमआरडीए विभागाकडून मंजुर झालेली बिल्डींग नं. २३/ए, रूम नं. ६०२, हिरानंदानी, टाटानगर, मानखुर्द, मुंबई या सदनिकेचा ताबा मिळण्याकरीता दिनांक ०२/०८/२०२१ रोजी केलेल्या विनंती अर्जावर कार्यवाही करण्याकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एम.एम.आर.डी.ए.), मुंबई कार्यालयातील सहाय्यक समाज विकास अधिकारी श्री. सुनिल आटपाडकर यांनी मला रुपये २,००,०००/— इतकी स्वत:करीता लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. १,५०,०००/— स्विकारण्याचे मान्य करून नमूद लाचेची रक्कम रू. १,५०,०००/— आज रोजी माझेकडून स्वीकारली. म्हणुन माझी श्री. सुनिल आटपाडकर यांचे विरूध्द कायदेशीर तक्रार आहे. माझे लोकसेवक श्री. सुनिल आटपाडकर यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून ती मी वाचून पाहिली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

(प्रविण बनगोसावी),
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page

—

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) —

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page

नमूद ता. वेळी व ठिकाणी, यातील तक्रारदार हे कांदिवली (प) परिसरात रहिवास असून सन २०१६ मध्ये वरेल रेल्वे स्टेशनजवळील त्यांचे घर तोडल्यात येऊन त्याबदल्यात त्यांना मानखुर्द, हिरानंदानी टाटानगर येथे सदनिका देण्यात आली होती. पण त्यावेळी त्यांनी तिचा ताबा घेतला नव्हता. परंतु सध्या त्यांना सदनिकेची आवश्यकता असल्याने त्यांनी दि. ०२/०८/२१ रोजी MMRDA यांना अर्ज केला होता. सदर अर्ज प्रलंबित होता. या अर्जावर कार्यवाही करणेसाठी आलोसे यांनी रु. २ लाख ची मागणी तक्रारदाराकडे केल्यानुसार त्यांनी दि. ०६/०८/२१ रोजी ... येथे लेखी तक्रार दिली. दि. ०७/०८/२१ रोजी सदर तक्रारीवरून पडताळणी केली असता तक्रारदाराचे कामासाठी रु. २ लाखाची मागणी करून तडजोडीअंती रु. १,५०,०००/- स्विकारण्याचे कबूल केले. त्यानुसार दि. १०/०८/२१ रोजी केलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांनी तक्रारदाराकडून रु. १,५०,०००/- लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडले म्हणून त्यांचे विरुद्ध नमूद कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात येत ...

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पो. नि. प्रविण वनगोसावी. ला. प्र. वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused investigation due to........ (3) Transferred to P. S. ........

District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

Signature: 11/08/2021

तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression

of the Complainant / Informant.

Signature: 11.8.21

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name प्रविण पांडुरंग वनगोसावी

पदनाम Rank पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. मुंबई

तपासिक अं. चा कोड क्र.

Posting

Code No. of I. O. ........

1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........

1. Date and time of submitted to the Court

2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy

...hment to item 7 of **First Information Report**